**CNRNO.MHSN070007402025**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांच्या न्यायालयात.**

**(एम. ए. कुलकर्णी यांचे समक्ष)**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ७९/२०२५**

वादी – शिवाजी भगवान पाटील वगैरे

विरुध्द

प्रतिवादीं – वसंत शामराव पाटील वगैरे

.......................................................................................................

वादींतर्फे विधिज्ञ – श्री.ए.एच.पवार

प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री.डी.बी. कोठावळे

.......................................................................................................

**निशाणी क्र. ०५ वरील आदेश**.

**मिळकतीचे वर्णन –**

जिल्हा तुकडी सांगली तालुका व पोट तुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे कुची येथील गट नंबर ८१६, क्षेत्र १ हे. ५१ आर, आकार ९ रु. ८७ पै शेतमिळकत त्यातील झाड, झुड, ताल, बांध तदंगभुत वस्तूसहित व सर्व इजमेंटरी हक्कासहीत शेतमिळकत. मिळकतीच्या वर्णनामध्ये वर्णन केलेली मिळकत ही वादी क्र. १ ते ३ यांची वाडवडिलार्जित मिळकत आहे. गट क्र. ८१६ चा सातबारा पाहता ही मिळकत वादी यांना त्यांच्या वडिलांच्या मृत्युनंतर वारसाने मिळालेली

आहे. सदर मिळकतीमध्ये पूर्वी वादी यांचे वडील व त्यांचे भाउ यांच्यामध्ये आठ आठ आणे अशी वहिवाट होती व आहे. म्हणजे यातील वादी व वादींचे चुलते शंकर आकाराम पाटील यांची गट नं. ८१६ मध्ये मालकी व कब्जा आहे.

**०२.** वादींच्या पुढील कथनानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या गट क्र. ८३७ व ८३९ मध्ये येणेजाणेचा रस्ता ग. क्र. ८१५, ८१६, ८२५, ८२६ ८४१, ८४२ व ८४० मधून खुला करावा म्हणून तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे दि. १६. ८. २०१७ रोजी मामलतदार कोर्ट अॅक्ट कलम ५ प्रमाणे अर्ज क्र. रस्ता/४४/१७ दाखल केला होता. सदर अर्ज प्रलंबित असताना वादींचे वडील भगवान आकाराम पाटील मयत झाले होते. परंतु त्यांचे वारसांना म्हणजेच वादींना कोणतीही नोटीस न देता अथवा अर्जामध्ये सामील न करता सदरचा अर्ज पुढे चालून दि. ०३. १२. २०१८ रोजी मंजूर करण्यात आला. वादींनी सदर अर्जाविरुध्द उपविभागीय अधिकारी मिरज यांच्याकडे रिव्हीजन अर्ज दाखल केलेला होता. त्यानुसार सदर अर्ज अंशतः मान्य करुन प्रकरण फेरचौकशीसाठी तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे पाठविण्यात आले होते. त्याचा फेरचौकशी अर्ज क्रमांक जमीन/रस्ता /एसआर/१८/२३ असा होता. परंतु तहसिलदार यांनी कोणतीही चौकशी न करता दि. २७. ९. २०२३ रोजी सदर अर्ज फेटाळला. त्यानंतर सदर आदेशाविरुध्द वादींनी मिरज येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे रिव्हीजन अर्ज क्र. ५६०/२३ दाखल केला होता. सदर रिव्हीजनमध्ये तहसिलदार यांच्या आदेशास स्थगीती देण्यात आली होती. परंतु सदर रिव्हीजन देखील दि. २०. २. २०२५ रोजी फेटाळण्यात आले.

तहसिलदार यांच्याकडे दाखल फरचौकशी क्र. ५७/२५ अन्वये दि. १३. ३. २०२५ रोजी नोटीस काढून दि. २४. ३. २०२५ रोजी हजर राहण्याचे कळविले होते. सदर नेमलेल्या दिवशी मयत प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत रोजनामा लिहून दि. २८. ४. २०२५ तारीख नेमलेली होती परंतु दि. २९. ४. २०२५ रोजी प्रकरण बंद केलेबाबत वादी यांना कळविले.

**०३.** वादीच्या पुढील कथनानुसार वादी हे झालेल्या प्रकरणांमध्ये पक्षकार नव्हते. वादीच्या मयत वडीलांचे वारस सदर प्रकरणामध्ये न घेता प्रकरण मयत व्यक्तीविरुध्द चालविले आहे. तहसिलदार अथवा उपविभागीय अधिकारी यांनी सदरच्या बाबी विचारात न घेता वादीचे अर्ज व रिव्हीजन फेटाळले आहे. प्रतिवादी सदर बेकायदेशिर आदेशांचा आधार घेवून ग. क्र. ८१६ मधून रस्ता करण्याच्या प्रयत्नात आहेत. सदर रस्ता झाल्यास वादींच्या पिकाचे व झाडाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्या आदेशानुसार पोलिसांच्या मदतीने ग. क्र. ८१६ मधून रस्ता करु नये अथवा वादीचा शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन दाव्यातील कथनांना आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांच्या मालकीची व वहिवाटीची म्हणजे कुची येथील ग. क्र. ८३७ व ८३९ ची मिळकत आहे. सदर मिळकतीस जाण्यासाठी पूर्वीपासून ग. क्र. ८१५, ८१६, ८४१ व ८४० च्या हददीपर्यंत बैलगाडी रस्ता होता. याशिवाय कुची थबडेवाडी रस्त्यापासून ते प्रतिवादी क्र. १ ते

३ यांच्या शेतजमिनीपर्यंत इतर एकूण ५० गट आहेत. वर नमूद रस्त्यापासून ते प्रतिवादी यांच्या शेतजमिनीपर्यंत सुमारे एक ते दीड किलोमीटर अंतरापर्यंत रस्ता असून त्या रस्त्याचा वापर सुमारे ५० पेक्षा अधिक शेतकरी व प्रतिवादी करतात. याशिवाय वादी देखील कुची थबडेवाडी रस्त्यापासून जो रस्ता आहे, त्याच रस्त्याचा वापर करतात.

**०५.** प्रतिवादी क्र. ४ व प्रतिवादी क्र. ५ यांनी सदर रस्त्याने वादींच्या मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी हरकत अडथळा केल्यामुळे तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे अर्ज क्र. ४४/१७ दाखल केला होता. सदर अर्जामध्ये मयत भगवान आकाराम पाटील यांचे वारस चंपाबाई व शंकर हे प्रतिनिधीत्व करीत होते. त्यांनी मूळ अर्ज म्हणणे देखील दाखल केलेले आहे. सदर अर्जावर दोन्ही बाजूंचे म्हणणे घेवून रितसर सुनावणी होवून अर्ज दि. ३. १२. २०१८ रोजी मंजूर करण्यात आला होता. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादी क्र. ४, ५ व विठठल एकनाथ गोडसे यांनी रिव्हीजन अर्ज क्र. ४९८/१९ दाखल केला होता. सदर रिव्हीजन अर्जामध्ये मयत भगवान आकाराम पाटील यांचे प्रतिनीधी सामील असून देखील त्यांनी इतर वारसांना पक्षकार केलेले नव्हते. सदर आदेशानुसार प्रकरण तहसिलदार कवठेमहांकाळ यांच्याकडे रिमांड केले होते. त्याठिकाणी देखील त्यांनी इतर वारसांना पक्षकार केले नसल्याबाबत आक्षेप घेतला नसल्याने त्यांना या दाव्यात सदर आक्षेप घेता येणार नाही. त्यानंतर अर्चना कापसे तहसिलदार यांच्याकडे चंपाबाई पाटील यांनी फेरचौकशी अर्ज क्र. १८/१३ दाखल केला होता. सदर फेरचौकशी अर्जापैकी भगवान पाटील यांच्या वारसांना समाविष्ट केले

नव्हते. परंतु सदर अर्ज तहसिलदार यांनी फेटाळून लावला. त्या आदेशावर नाराज होवून रिव्हीजन क्र. ५६०/२०२३ दाखल केले होते. त्या रिव्हीजन अर्जात देखील भगवान पाटील यांच्या इतर वारसांना समाविष्ट केलेले नव्हते. सदर रिव्हीजन अर्ज देखील उपविभागीय अधिकारी मिरज यांनी खर्चासह फेटाळून लावला आहे. सबब सर्व रिव्हीजन व फेरचौकशी अर्ज फेटाळून लावले असल्याने रस्ता होणार याची पूर्ण खात्री झाल्यानंतर तांत्रीक कारण पुढे करुन प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे.

**०६**. प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांचा येणेजाणेचा रस्ता आडविल्याने त्यांनी तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला होता. त्यामध्ये ग्रामपंचायत कुची यांनी ग. क्र. ८१५ व ८१६ मधून रस्ता असल्याचा दाखला दिलेला आहे. तहसिलदार यांच्याकडे प्रकरण रिमांड झाल्यानंतर स्थळपाहणी करण्यात आलेली होती. त्यामध्ये ग. क्र. ८१५ व ८१६ मधील शेतक–यांनी रस्ता अडविल्याचे निदर्शनास आले होते. सदर रस्ता आडविल्यामुळे प्रतिवादींचे उस पिक कारखान्यास जाण्यास अडचण निर्माण होत आहे.

**०७**. प्रतिवादींच्या पुढील कथनानुसार थबडेवाडी रस्ता पूर्व पश्चिम चालीचा असून तेथून दक्षीणेकडील गटांना जाण्यासाठी तोच रस्ता उपलब्ध आहे. ग. क्र. ८३७ व ८३९ मध्ये येणेजाणेचा रस्ता वादींनी बंद केला असल्यामुळे प्रतिवादींचे नुकसान होत असून त्यांना त्यांच्या जमीनीमध्ये जाता येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०८.** वादींतर्फे विधिज्ञ व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. त्याचा सारासार विचार करुन या कामी मी खालील मुददे उपस्थित कले आहेत. त्यानुसार त्यांची कारणमीमांसा पुढे दिली आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | वादी आपली बाजु प्रथम दर्शनी सिध्द करतो काय? | नकारार्थी. |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय? | नकारार्थी. |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे अंतरिम मनाई आदेश वादीच्या बाजूने न झाल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा.**

**मुद्दा क्र. १ बाबत**

**०९.** वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादीचे वडील भगवान सन २०१९ साली मयत झालेले असताना देखील प्रतिवादींनी तहसीलदार कवठेमहांकाळ यांचेकडे रस्तयाबाबत दाखल केलेल्या अर्ज क्र. ४४/२०१७ मध्ये मयतांच्या वारसांना पक्षकार केलेले नाही. त्यामुळे सदरचा आदेश प्रस्तुत वादींवर बंधनकारक नाही. याशिवाय सदर अर्जामध्ये ८३७ व ८३९ मधील तसेच ज्या गटांतून रस्ता मागितला होता त्या सर्व खातेधारकांना पक्षकार

केलेले नाही. उपरोक्त बाबी रिव्हीजन अर्जामध्ये दर्शवून देखील त्या विचारात घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदरचे सर्व आदेश बेकायदेशिर आहेत. सदर बेकायदेशीर आदेशाच्या आधारे प्रतिवादी रस्ता तयार करत असल्याने, त्यामध्ये वादीचे कधीही न भरुन होणारे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** याउलट प्रतिवादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की अर्ज क्र ४४/२०१७ विरुध्द रिव्हीजन क्र ४९८/२०१९ तर अर्ज क्र. १८/२०२३ विरुध्द रिव्हीजन क्र. ५६०/२०२३ अशी दोन रिव्हीजन व दोन अर्ज प्रकरणे दाखल करण्यात आलेली. त्यामध्ये अर्ज क्र. ४४/२०१७ मंजूर करण्यात आलेला होता व रिव्हीजन क्र. ४९८/२०१९ रिव्हीजन नुसार प्रकरण फेरतपासासाठी दाखल करण्यात आले होते. त्यानुसार तहसिलदार यांच्याकडे फेरचौकशी अर्ज क्र. १८/२०२३ दाखल करण्यात आला होता. तो अर्ज नामंजूर झाल्याने त्याविरुध्द रिव्हीजन क्र. ५६०/२०२३ दाखल करण्यात आले होते. परंतु सदरचे रिव्हीजन फेटाळण्यात आले होते. अशी परिस्थीती असताना चंपाबाई पाटील हिने रिव्हीजन क्र. ४९८/२०१९ चा आधार घेवून फेरचौकशी अर्ज क्र ५७/२०२५ दाखल करण्यात आला होता. सदर अर्जामध्ये मयत भगवान आकाराम पाटील यांचे वारस चंपाबाई व शंकर हे प्रतिनिधीत्व करीत होते. त्यांनी मूळ अर्ज म्हणणे देखील दाखल केलेले आहे सदर अर्ज देखील फेटाळण्यात आला होता. वादीने न्यायालयाची दिशाभुल करुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वास्तवीकतः जे व्यक्ती रस्ता आडवुन जाणे येण्यास हरकत अडथळा करतात

त्यांच्या विरुध्द दाद मागण्यात आलेली होती, सदर अर्ज व रिव्हीजन हे सर्व वस्तुस्थीती विचारात घेउन गुणदोषांवर निकाली काढण्यात आलेले आहेत. वादी केवळ मंजुर झालेला रस्ता प्रतिवादीस मिळु नये यासाठी प्रस्तुतचा दावा व अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**११.** निशाणी क्र. ३ यादीसोबत एकुण १०ए नि.क्र २५ सोबत १ व निक्र. ४४ सोबत १४ अशी कागदपत्रे सादर केली आहेत. सदर कागदपत्रांची आवश्यकता भासेल त्या ठिकाणी उल्लेख केला जाईल. तर प्रतिवादीतर्फे निशाणी क्र. ४७ सोबत एकुण ०१ व नि.क्र ४९ सोबत १३ कागदपत्रे सादर केलेली असून त्यांची आवश्यकता भासेल त्या ठिकाणी उल्लेख केला जाईल.

**१२.** प्रथमदर्शनी अभिलेखावरील पुरावा विचारात घेता, प्रस्तूत प्रकरणात वादी व प्रतिवादी त्यांच्या एकमेकांच्या मिळकतीवरील मालकी हक्क व कब्जा याबाबत वाद असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तूत प्रकरणातील वादाचे स्वरुप विचारात घेता वादीचा मुख्य आक्षेप तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या निकालासंबंधी असल्याने प्रथमदर्शनी सदर निकालांची वैधता तपासणे आवश्यक ठरते.

**१३.** वादी तर्फे अभिलेखावर जमीन/रस्ता ४४/ एस आर / १७२४/ दि. ०३.१२.२०१८ रोजीची तहसिलदार यांच्या निकालाची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. सदर निकालपत्राचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी असे दिसून येते की, प्रतिवादी वसंत, श्रीमंत व मयत संभाजी यांनी तहसिलदार कवठे महांकाळ यांच्याकडे गट नं. ८३७ व ८३९ मध्ये जाण्या–येण्यासाठी गट नं.

८१५, ८१६,८२५,८२६,८४१ व ८४२ च्या सिमेलगता बैलगाडी रस्ता खुला करुन मिळावा म्हणुन चंपाबाई शिवाजी पाटील, भगवान आकाराम पाटील, शंकर आकाराम पाटील, राजाराम निवृत्ती पाटील, रामचंद्र आप्पासाहेब पाटील व तानाजी महादेव भोसले यांचेविरुध्द मामलेदार न्यायालय अधिनियम १९०६ कलम ५ अन्वये अर्ज दाखल केला होता. तहसिलदार यांनी दोन्ही पक्षांना अर्जाची नोटीस देऊन त्यांचे लेखी म्हणणे घेतले होते. सदर दाखल केलेल्या म्हण्ण्यानुसार, अर्जदार यांनी मागणी केलेला कोणताही रस्ता अस्तित्वात नाही. महत्वाची बाब म्हणजे गट नं ८३७ व ८३९ मधुन सरबांधावरुन दक्षिणोत्तर गट नं ८३० ला गाडी रस्त्याची वाट दिली तर अर्जदार यांना वाट गैरअर्जदार गट न ८१६ मधुन वाट देतील अन्यथा त्यांचा सदर रस्त्यास विरोध असेल, असे जाबदार यांनी म्हणणे दाखल केल्याचे आदेशात नमुद आहे. सदर आदेशामध्ये दिनांक ०८/०१/२०१८ रोजी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केल्याचे नमुद असुन, त्यानुसार कुची ते थबडेवाडी रस्त्यापासुन दक्षिणेस पाणमळयास जाणारा बैलगााडी रस्ता असुन, सदर रस्ता उकरुन बंद केल्याचे दिसुन आलेले असल्याने तहसीलदार यांनी रस्ता खुला केल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे.

**१४.** अभिलेखावर दाखल निकालांच्या प्रतिंवरुन, सदर आदेशाविरुद्ध चंपाबाई पाटील, शंकर पाटील व विठ्ठल भोसले यांनी रिव्हीजन क्र. ४९८/२०१९ दाखल केले होते. संबंधित प्राधिकाऱ्यांनी तो रिव्हीजन अंशतः मंजूर करून प्रकरण फेरतपासणीसाठी तहसिलदार यांच्याकडे पाठविले होते. त्यानुसार तहसीलदार

यांचेकडे फेरचौकशी अर्ज क्र. १८/२०२३ दाखल करण्यात आला होता, दिनांक २७.०९.२०२३ यांनी तहसिलदार यांनी सदर फेरचौकशी अर्ज नामंजूर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. सदर आदेशाविरुद्ध पुन्हा चंपाबई पाटील, शंकर पाटील व विठ्ठल भोसले रिव्हीजन क्र. ५६०/२०२३ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये उपविभागीय अधिकारी मिरज यांचेकडे सुनवाणी होउन दिनांक २०.०२.२०२५ रोजी निकाल होउन रिव्हीजन फेटाळण्यात आल्याचे दाखल कागदपत्रावरुन दिसत आहे.

**१५.** रिव्हीजन क्र. ५६०/२०२३ मध्ये झालेल्या निकालामध्ये वर नमुद यापुर्वी झालेल्या सर्व प्रकरणांचा उल्लेख केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. सदर आदेशातील निष्कर्षाप्रमाणे गैरअर्जदार यांनी ग्रामपंचायत येथे नोंद असणारा रस्ता बंद केला असुन, त्यातील अर्जदार यांना इतर कोणताही पर्यायी रस्ता नसल्याचा निष्कर्ष स्थळ पहाणीअंती केला असल्याचे दिसत असल्याने तहसीलदार यांचा आदेश कायम केला असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. वादींतर्फे असा मुख्य आक्षेप आहे की चंपाबाई पाटील यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर नसतानाही त्यांना प्रकरण क्र ४४/२०१७ या प्रकरणात पक्षकार करण्यात आले होते, याउलट मयत भगवान यांचे वारस म्हणजे वादी यांना सदर कार्यवाहीत

सामाविष्ट केलेले नव्हते, त्यामुळे संपूर्ण कार्यवाही बेकायदेशीर आहे. याउलट प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र ४ चंपाबाई शिवाजी पाटील ही वादी शिवाजी भगवान पाटील यांची पत्नी व मयत भगवान आकाराम पाटील यांची सुन असुन, प्रतिवादीं क्र १ ते ३ यांना तिच्यामार्फतच रस्त्यासाठी हरकत अडथळा होत होता, त्यामुळे तिला सदर अर्जामध्ये गैरअर्जदार केले होते.

**१६**. अभिलेखावर दाखल ७/१२ उतारे विचारात घेता त्यामध्ये वादींच्या कथनाप्रमाणे चंपाबाई भगवान पाटील यांचे नाव उत–यावर नमुद असल्याचे दिसत नाही. परंतु या ठिकाणी हे नमुद करणे आवश्यक ठरते की, प्रकरण क्र ४४/२०१७ मधील आदेश आव्हानीत करणे असो वा त्याची फेरचौकशीचे अर्ज सादर करणे यामध्ये पहिली अर्जदार ही चंपाबाई असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. सबब, ७/१२ उता–यावर नाव नसताना वेळोवेळी तहसीलदार यांच्या आदेशाविरुध्द दाद मागण्याची बाब विचारात घेता, सकृतदर्शनी चंपाबाई यांचा प्रकरणाशी संबंध नव्हता हा आक्षेप स्विकारता येणार नाही. सबब उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन सकृतदर्शनी असे दिसते की चंपाबाई यांनी कार्यवाहीमध्ये सहभाग घेतला होता व त्यांनी आपले म्हणणे मांडलेले होते. प्रविादी क्र ४ चंपाबाई शिवाजी पाटील या वादी शिवाजी भगवान पाटील यांच्या पत्नी असल्याबाबत

वादींना आक्षेप असल्याचे दिसत नाही. सबब मयत भगवान याचे पाश्चात वादींच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व झालेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

**१७.** मामलेदार न्यायालय अधिनयम कलम ५ अंतर्गत होणारी कार्यवाही ही संक्षिप्त असून तिचा मुख्य उद्देश रस्त्यातील अडथळा दूर करून त्वरित दिलासा देणे हा आहे. सबब अशा कार्यवाहीमध्ये पक्षकारांचा समावेश हा प्रत्यक्ष अडथळा करणाऱ्या व्यक्तींपरता मर्यादीत स्वरुपाचा असतो. सदर प्रकरणात कोणतीही मालकी ठरवली जात नसल्याने, सदर कारवाई महसूल नोंदीतील नावांवर अवलंबून नसते. सदर झालेल्या सर्व सुनावणींचे स्वरुप व गुणवत्ता हा मुद्दा अंतिम टप्प्यावर तपासता येईल. जरी वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ साक्षीदारांचे शपथपत्र सादर केलेले असले, तरीही या टप्प्यावर संपूर्ण कार्यवाही बेकायदेशीर ठरेल अशी बाब सकृतदर्शनी अभिलेखावर आलेली नाही त्यामुळे वादीतर्फे सादर साक्षीदारांची शपथपत्रे याटप्पयावर विचारात घेता येणार नाहीत. याशिवाय महत्वाची बाब म्हणजे वादीने प्रस्तुत दावा व अर्ज दाखल करताना वरील संपूर्ण घटनाक्रम न्यायालयासमोर पूर्णपणे व प्रामाणिकपणे मांडलेला नाही. त्यामुळे वादींच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द होत नाही. सबब मुद्दा क्र. १ नकारार्थी स्वरुपात उत्तरीत करीत आहे.

**मुद्दा क्र. २ व ३ बाबत –**

**१८.** सदर प्रकरणात वादींचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या जमिनीमधून रस्ता केल्यास त्यांच्या पिकांचे व झाडांचे नुकसान होईल. तथापि, प्रतिवादींच्या बाबतीत विचार करता, त्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असल्याबाबत संपुर्ण अर्जामध्ये वादीचे कथन नाही. सबब त्यांना रस्ता उपलब्ध झाला नाही, तर त्यांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीत जाणे–येणे अशक्य होईल व त्यांचे दैनंदिन जीवन व शेती बाधित होईल. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता, प्रतिवादींना होणारे नुकसान अधिक गंभीर व प्रत्यक्ष स्वरूपाचे आहे. वादींचा दावा आहे की, त्यांच्या झाडांचे नुकसान होईल. परंतु, तशी झाडे असल्याबाबतचा कोणताही पुरावा प्रथम दर्शनी वादीतर्फे सादर करण्यात आलेला नाही. सबब सोयीचा समतोल व दोन्ही कल प्रतिवादीच्या बाजूने झुकणारे आहेत. सबब मी मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा नि. क्र. ०५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.05.02 18:06:33 +0530

**दिनांक – ०२.०५.२०२६** **( एम. ए. कुलकर्णी )**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कवठेमहांकाळ.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade – III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 01.04.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 01.04.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 02.04.2026 |